# दुसऱ्या आवृत्तीची प्रस्तावना

मे महिन्यात केव्हातरी साधना साप्ताहिकाचे संपादक विनोद शिरसाठ यांचा मला फोन आला. स्वामी रामानंद तीर्थ यांच्या इंग्रजी आत्मचरित्राची श्री.भाऊसाहेब देऊळगावकर यांनी केलेल्या मराठी अनुवादाची दुसरी आवृत्ती सप्टेंबर महिन्यात प्रसिद्ध होणार असल्याचे त्यांनी मला सांगितले व त्याची प्रस्तावना मी लिहावी असेही सुचवले. श्री. किशोर देऊळगावकर व श्री.अतुल देऊळगावकर यांचीही तशी इच्छा असल्याचे त्यांनी मला सांगितले. त्याच दरम्यान किशोर बेडकिहाळ यांनीही मला फोन करून तसे सुचवले होते. स्वामीजींच्या काळाचा मीही एक साक्षीदार होतो, याची श्री. शिरसाठ यांनी मला आठवण करून दिली व ते म्हणाले, 'आपले वय लक्षात घेऊन मी आपल्याला भरपूर वेळ देत आहे, आपण नाही म्हणू नये.' पूज्य स्वामीजींबद्दल माझ्या मनात असलेला आत्यंतिक आदर व माझ्या मित्रांचा प्रेमळ आग्रह या दोन्ही गोष्टी लक्षात घेऊन मी प्रस्तावना लिहिण्याचे मान्य केले.

स्वामीजींच्या आत्मचरित्रातून प्रकट झालेले विचार योग्यरीत्या अनुवादित करण्याबाबत श्री. भाऊसाहेब देऊळगावकर यांनी किती खबरदारी घेतली होती, याची प्रचिती त्यांच्या 'निवेदन' या प्रास्ताविकातून जाणवते. भाऊसाहेब लिहितात, "1959 च्या शेवटी हे काम पूर्ण होऊन मी हे हस्तलिखित घेऊन पूज्य स्वामीजींना दाखविण्यासाठी हैद्राबादला जाऊन आलो. त्यांनी माझ्यासाठी संपूर्ण दिवसच राखून ठेवला होता. त्या दिवशी आम्ही दोघेच त्यांच्या निवासस्थानी होतो. पहाटे पाचपासून रात्री आठपर्यंत (मध्यंतरी स्नान व जेवणासाठी विश्रांती घेतली तेवढीच) माझे वाचन चालले होते. पूज्य स्वामीजी प्रत्येक वाक्य मोठ्या लक्षपूर्वक ऐकत होते. सगळे वाचून झाल्यानंतर त्यांनी अनुवादाबद्दल पसंती व्यक्त केली व 'प्रकाशनाची लवकर व्यवस्था करतो' असे म्हणाले." भाऊसाहेबांनी घेतलेली दक्षता अत्यंत योग्य अशी होती, कारण मूळ लेखकाला अभिप्रेत असलेले विचार अनुवादात योग्य शब्दांत प्रकट होणे

अत्यंत आवश्यक असते व ते भाऊसाहेबांनी केले होते.

पुस्तकाच्या सुरुवातीस भारताचे माजी पंतप्रधान व पूज्य स्वामीजींचे महत्त्वाचे सहकारी श्री. पी. व्ही. नरसिंहराव यांचा स्वामीजींसंबंधी एक उत्कृष्ट लेख आपल्याला वाचावयास मिळतो. तो सर्वच लेख मुळातून वाचावा असा आहे. त्या लेखातील एक लहानसा भाग मी खाली देत आहे. ते लिहितात, "गेल्या चार दशकांत ज्या काही अगदी थोड्या व्यक्तींविषयीचे माझ्या मनात अत्यंत श्रद्धायुक्त भक्तीचे व आदराचे स्थान मी देऊ शकतो, त्यात पूज्य स्वामीजी एक आहेत... त्यांच्यापेक्षा निष्णात व सरस वादविवादपटू मी पाहिले आहेत, आपल्या भाषणाने श्रोत्यांवर छाप पाडून त्यांना वश करून घेणाऱ्या त्यांच्यापेक्षा श्रेष्ठ वक्त्यांची भाषणं मी ऐकली आहेत. कदाचित इतर काही लोकांनी त्यांच्यापेक्षा अधिक त्यागसुद्धा केला असेल आणि अधिक कष्ट अन् यातना सहन केल्या असतील. केवळ बुद्धिमत्तेच्या प्रखरतेचाही विचार केला तर त्यांच्यात काही असामान्यत्व नव्हते. सारे असे असूनसुद्धा साकल्याने विचार करता स्वामीजींचे आवाहन व त्यांची अनिर्वचनीय आकर्षणशक्ती मात्र अद्वितीय व अतुलनीय ठरेल."

स्वामीजींना मी पहिल्यांदा 1947 च्या सुमारात पाहिल्याचे आठवते. त्या वेळी मी शाळकरी मुलगा होतो. भगवी वस्त्रे परिधान केलेले, कृष्णवर्णीय व किरकोळ बांध्याचे स्वामीजी मला अजूनही स्पष्ट आठवतात. निजामाविरुद्ध पूर्ण ताकदीने लढा देणाऱ्या संन्याशाला पाहून मी भारावून गेलो होतो. त्यानंतरच्या काळात मी त्यांना कित्येकदा पाहिले, कारण त्या वेळी हैद्राबाद शहरातच त्यांचे वास्तव्य होते. त्यांची भाषणेही ऐकण्याचा योग कित्येकदा आला. 1960 च्या आसपास हैद्राबादच्या सरोजिनी देवी हॉलमध्ये स्वामीजींच्या अध्यक्षतेखाली भाषावार प्रांतरचनेबाबत जो परिसंवाद झाला होता, त्यात मीही एक वक्ता होतो व त्या वेळी स्वामीजींबरोबर बोलण्या-बसण्याची संधी मला मिळाली होती.

त्या काळात हैद्राबाद संस्थानातील हिंदूंची स्थिती अधिकच दयनीय झाली होती. रझाकारांचा संस्थानात गोंधळ चालू होता. तसे पाहता हिंदूंवर अन्याय हा हैद्राबाद संस्थानाचा जुना रोग होता. संस्थानातील 88 टक्के हिंदूंना शासनात नगण्य प्रतिनिधित्व होतं. जेमतेम दहा टक्केही नसलेल्या मुसलमानांना मात्र 88 टक्के प्रतिनिधित्व होतं. संस्थानातील प्रमुख भाषा तेलगू, मराठी व कानडी या होत्या. पण कोणत्याही शासकीय शाळेत त्या शिकवण्याची सोय नव्हती. शाळेत असताना मी मराठीची मुळाक्षरेही शिकलो नाही. उर्दू मात्र प्रत्येक शासकीय शाळेत सक्तीने शिकवण्यात येत असे. मी पाचवीच्या वर्गात गेलो तेव्हा दुय्यम भाषा म्हणून फारसी किंवा अरबी या दोन भाषांपैकी एक भाषा मला निवडायची

होती. पण दुसरा कोणताही पर्याय माझ्यासमोर नव्हता. पाचवी ते सातवीपर्यंत मी उर्दू भाषेतून निरनिराळे विषय शिकलो. असा तो काळ होता!

त्या काळातील एक आठवण मला येथे सांगावीशी वाटते. कारण ती आठवण व्यक्तिगत असूनसुद्धा तिचे स्वरूप प्रातिनिधिक असे आहे. 1947 च्या सुरुवातीच्या काळातील ही गोष्ट आहे. हैद्राबादमधील एका नावाजलेल्या शाळेचा मी विद्यार्थी होतो. शाळेतील बहुसंख्य विद्यार्थी मुस्लीम होते. शिक्षकही त्या समाजाचेच होते. त्या सर्वांचाच हैद्राबाद संस्थान भारतात सामील होण्याच्या संकल्पनेला विरोध होता. एके दिवशी एका मुस्लीम शिक्षकाने वर्गात शिरताच आम्हा विद्यार्थ्यांना 'The Future Of Hyderabad' या विषयावर निबंध लिहिण्यास सांगितले. माझे डोके ठिकाणावर नव्हते. इतर हिंदू तरुणांप्रमाणे माझ्याही मनात जे काही घडत होते त्याबद्दल प्रचंड क्षोभ होता. हिंदूंवर होणारा अन्याय, जबाबदार शासनाचा अभाव व भारतात सामील होण्याबाबत निजामाचा विरोध या सर्व गोष्टींचा उल्लेख करून मी शेवटी हे वाक्य लिहिलं होतं: 'Hyderabad has absolutely no future unless a responsible government is established in the state and unless and until Hyderabad accedes to the Indian union.'

त्या लेखामुळे माझ्या शिक्षकाच्या दृष्टीने मी गद्दार ठरलो होतो!

साधारणतः 1938 पासून हैद्राबाद संस्थानात राजकीय घटनांना वेग आला होता. याच वर्षी हैद्राबाद स्टेट काँग्रेस हा पक्ष अस्तित्वात आला व त्यांच्यावर ताबडतोब बंदीही टाकण्यात आली. उस्मानिया विद्यापीठातील हिंदू विद्यार्थ्यांवर 'वंदे मातरम' हे गीत गाण्यास मनाई करण्यात आली ती याच सुमारास. त्याचा परिणाम म्हणून हिंदू विद्यार्थ्यांना उस्मानिया विद्यापीठ सोडावे लागले होते. ब्रिटिश इंडियातील आर्य समाजाशी व हिंदू महासभेशी संबंध असलेल्या तरुणांनी हैद्राबादेतील हिंदूंवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध आंदोलन सुरू केले होते व तुरुंगवासही भोगला होता. या घटना 1938-39 च्या आहेत. स्वामीजींनी त्या काळात हिंदूंवर होणाऱ्या अन्यायांना वेगळ्या दृष्टीकोनातून पाहिले होते. हिंदू विरुद्ध मुस्लीम ही भूमिका त्यांनी स्वीकारली नाही. आजच्या लोकशाही युगात बहुसंख्यांवर होणारे अन्याय हे लोकशाहीच्या तत्त्वांच्या विरुद्ध आहेत अशी भूमिका त्यांनी घेतली व ती भारतीय पातळीवर काँग्रेसच्या धोरणाशी सुसंगत होती. या काळात भारताची स्वातंत्र्याकडे वेगाने वाटचाल चालू होती. 3 जून 1947 च्या माउंटबॅटन प्लॅनप्रमाणे देशाचे विभाजन तर होणार होतेच, एवढेच नव्हे तर देशातील 552 संस्थानेही स्वतंत्र होणार होती. या संस्थानांना भारतात वा पाकिस्तानात सामील होण्याची किंवा स्वतंत्र राहण्याची

मुभा देण्यात आली होती. पण निझामाने हैद्राबाद संस्थान स्वतंत्र राहणार अशी घोषणा केली होती.

संस्थानासह भारत स्वतंत्र होणार, असे भारतीय नेत्यांनी गृहीत धरले होते. पण घडले ते वेगळेच व धक्कादायक. नेहरूंच्या दीर्घ मुलाखती घेण्याचे भाग्य मला लाभले होते. त्यातल्या एका मुलाखतीत मी नेहरूंना ब्रिटिशांनी संस्थानांबाबत स्वीकारलेल्या धोरणासंबंधी प्रश्न विचारला होता. सूचकरीत्या नेहरू म्हणाले होते, 'The British played a trick over us.'

हैद्राबाद स्टेट काँग्रेसवर टाकण्यात आलेल्या बंदीनंतरही स्वामीजींनी प्रांतिक परिषदांच्या मदतीने आपले काम नेटाने चालू ठेवले होते. भारत स्वतंत्र होण्याच्या उंबरठ्यावर असताना स्वामीजींचे कार्य अधिकच कठीण झाले होते. रझाकारांचा धुमाकूळ वाढला होता. भरीत भर म्हणून कम्युनिस्टांनी रझाकारांशी हात मिळवणी केली होती. त्यांनीही हैद्राबाद संस्थान भारतात सामील होण्याच्या कल्पनेला विरोध केला होता. हैद्राबाद संस्थानातील नलगोंडा जिल्ह्यातील गरिबीचा व हलाखीचा फायदा घेऊन त्या जिल्ह्याला आपला बालेकिल्ला बनवण्याचा कम्युनिस्टांचा विचार होता. त्याकरता हैद्राबाद संस्थान स्वतंत्र राहणे त्यांच्या दृष्टीने सोयीचे होते. त्या काळात हैद्राबाद शहरातील हशमतगंज या भागात हैद्राबादमधील एका नामवंत अशा कम्युनिस्ट पुढाऱ्याचे भाषण मी ऐकले होते. आपल्या दोन तासांच्या भाषणात हैद्राबाद संस्थान भारतात सामील होण्याच्या कल्पनेचा त्यांनी जोरदार विरोध केला होता. हैद्राबाद संस्थान भारताचा एक भाग झाल्यानंतरही नलगोंडा जिल्ह्यात कम्युनिस्टांचा उपद्रव कमी-अधिक प्रमाणात चालूच राहिला. त्या काळात (म्हणजे 1949 च्या सुरुवातीस) सरदार पटेल हैद्राबादेस आले होते. त्यांचे भाषण 'फते मैदान' नावाने ओळखल्या जाणाऱ्या एका मैदानात (आज तेथे 'लाल बहादूर स्टेडियम' आहे) झाले होते. त्या विराट सभेत सरदार पटेल म्हणाले होते, "में कम्युनिस्टों को यह कहना चाहता हूँ के वो जो नलगोंडा मे गडबड कर रहे है उसको वो बंद कर दे, वरना में उनकी जड उखाड दूँगा।" आणि नंतर पटेलांनी नंजाप्पा नावाच्या एका सैनिकी अधिकाऱ्याला तेथे पाठवले होते, ज्याने त्या बंडाचा बीमोड केला होता. पण हा झाला पुढचा भाग. मी लिहीत होतो 'पोलीस ॲक्शन'च्या काही महिने अगोदरच्या काळाबद्दल, जेव्हा स्वामीजी कठीण प्रसंगांना एकांड्या शिलेदाराप्रमाणे तोंड देत होते. जेलच्या वाऱ्या त्यांना कराव्या लागत होत्या. शासनातील धूर्त अधिकारी त्यांना भेटायचे आणि 'जबाबदार शासना'चा विषय टाळून इतर सवलतींबद्दल बोलायचे व त्यांच्या विरोधाची तलवार बोथट करण्याचा प्रयत्न करायचे, पण स्वामीजींनी

त्यांची डाळ शिजू दिली नाही!

पूज्य स्वामीजींच्या असामान्य नेतृत्व गुणांबद्दल श्री.पी.व्ही. नरसिंहराव यांनी आपल्या लेखात पुष्कळ काही लिहिले आहे. त्यातला एक लहानसा भाग मी खाली देत आहे. त्यावरून स्वामीजींच्या व्यक्तिमत्त्वाची ओळख आपल्याला पटते. नरसिंहराव लिहितातः "स्वामीजींनी आम्हाला जी साद घातली ती केवळ राजकीय स्वरूपाचीच नव्हती; तशीच तीत केवळ उपयुक्ततावादी दृष्टी नव्हती. मला अपरिचित अशा अध्यात्म क्षेत्रात न शिरता मी एवढे सांगू शकेन की, स्वामीजींची हाक राजनीतीयुक्त आध्यात्मिक अशी होती. जेव्हा स्वामीजींनी हाक दिली त्या वेळी त्यांचा काय उद्देश असावा याविषयी विचार करण्यासाठी आम्ही क्षणभरही थांबलो नाही. त्यांनी आपल्या कार्यक्रमाची रूपरेखा आमच्यापुढे मांडली, तेव्हा आमच्यावर होणाऱ्या संभाव्य परिणामांचीही आम्ही कधी चिंता केली नाही. अशा रितीने स्वामीजी, त्यांचे कार्य व त्यांचे अनुयायी हे सारे पूर्णपणे एकरूप बनून गेलो. अशा भावनात्मकतेने आम्ही त्यांच्या कार्याशी निगडित झालो होतो; त्याप्रमाणे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाने राजनीती अन् अध्यात्म यांमध्ये एकरूपता निर्माण झाली होती."

स्वामीजी ज्या काळात हैद्राबाद संस्थानातील स्वातंत्र्यलढ्याचे नेतृत्व करत होते, त्याच काळात मी हैद्राबाद शहरात लहानाचा मोठा झालो. हैद्राबाद शहरात घडलेल्या काही घटनांचा ठसा आजही माझ्या मनावर आहे. हैद्राबाद संस्थानात त्या काळी खेडोपाडीही हिंदूंवर रझाकारांनी काय अत्याचार केले, त्याची वर्णने या विषयावरील बऱ्याच पुस्तकांत आली आहेत. तुलनात्मकदृष्ट्या हैद्राबाद शहरात अशा प्रसंगांची तीव्रता कमी होती, कारण सगळीकडे आलबेल आहे असा आभास निझामाला निर्माण करायचा होता. पण असे असूनही हैद्राबाद शहरात 22 ऑगस्ट 1948 च्या मध्यरात्री एक भयंकर प्रकार घडला होता! त्यापूर्वी काही दिवस आधी हैद्राबादमधील 'झमरुद्ध महल' या सिनेमा थिएटरमध्ये कासिम रझवी याने एक अत्यंत प्रक्षोभक असे भाषण केले होते. तो म्हणाला होता, 'आमच्याविरुद्ध जो लिहील त्याचे हात कलम करण्यात येतील, आमच्याविरुद्ध जो बोलेल त्याची जीभ छाटण्यात येईल.' रझवीने ही धमकी एका तरुण राष्ट्रवादी पठाणाला उद्देशून दिली होती, जो 'इमरोझ' नावाच्या दैनिकाचा संपादक होता व जो रझाकारांचा विरोधक होता. वर लिहिल्याप्रमाणे 22 ऑगस्टच्या मध्यरात्री भर शहरात त्याचा अमानुषरीत्या खून करण्यात आला. या घटनेने पंडित जवाहरलाल नेहरूही हादरले होते. त्या तरुणाचं नाव होतं, शोएब उल्ला खान!

त्या काळातली दुसरी एक घटना जी मला आजही प्रकर्षाने आठवते, तिचे

स्वरूप वेगळे आहे. ही घटना फेब्रुवारी 1948 च्या पहिल्या आठवड्यातली आहे. महात्मा गांधींच्या खुनानंतर सर्व राजकीय पक्षांतर्फे जी शोकसभा निझाम कॉलेजच्या प्रशस्त प्रांगणात झाली, तिच्याशी ही आठवण निगडित आहे. त्या काळी हिंदू स्त्रिया रझाकारांच्या भीतीने सहसा घराबाहेर पडत नसत, पण या सभेचे स्वरूप वेगळे असल्यामुळे त्याही मोठ्या संख्येने सभेला हजर होत्या. रझाकार संघटनेचा नेता कासिम रझवी हाही या सभेत भाषण करणार होता, म्हणून रझाकारही त्या सभेला हजर होते. स्वामीजी त्या वेळी तुरुंगात होते असे मला आठवते. पहिले भाषण स्टेट काँग्रेसतर्फे बी. रामकृष्णराव यांचे झाले. त्यानंतर शिया संघटनेचे अध्यक्ष बोलले व इतर दोन-चार नेत्यांची भाषणे झाली. तेव्हा कासिम रझवी बोलायला उभा राहिला, तेव्हा श्रोत्यांचे कुतूहल विलक्षण चाळवले गेले. रझवीला मी त्यापूर्वीही पाहिले होते व त्याची भाषणेही ऐकली होती. पण त्या दिवशी मी त्याला अगदी जवळून पाहत होतो. बऱ्यापैकी गोरा रंग, मध्यमपेक्षाही कमी उंची, निळी शेरवानी, जिना कॅप असा दाढीदारी रझवी आपल्या प्रक्षोभक भाषणांकरिता लोकांच्या परिचयाचा होता. तो दोन-चार वाक्य गांधींवर बोलला, पण नंतर त्याच्या भाषणाची गाडी स्वतंत्र हैद्राबादच्या रुळावर गेली. श्रोत्यांमध्ये विलक्षण चुळबूळ सुरू झाली. वेगवेगळ्या पक्षांचे नेतेही बैचन झाल्याचे मला जाणवले. पण रझवीला थांबवणार कोण! कुणात होती ती हिंमत व तीही हत्यारबंद रझाकार तेथे हजर असताना. पण इतक्यात एक नवल घडलं! कासिम रझवीपासून थोड्या अंतरावर उभा असलेला एक तरुण रझवीला उद्देशून तारस्वराने व हातवारे करून ओरडला, 'We don't want this, we don't want this, we don't want this!'

त्या धाडसी तरुणाने तेथे जमलेल्या हजारो लोकांच्या मनातील क्षोभाला वाचा फोडली होती! आणि मग आम्ही सर्वांनीच त्या तरुणाच्या विरोधाला पाठिंबा दिला होता! शोकसभेचा तेथेच अंत झाला! त्या तरुणाला मी ओळखत होतो. माझ्याच कॉलेजचा, म्हणजे निझाम कॉलेजचा तो विद्यार्थी होता व सेठना असे त्याचे नाव होते. या क्षणी मी हे सगळे लिहीत असताना माझ्या मनःचक्षूंसमोर तो धाडसी तरुण उभा आहे. उंच, सडपातळ व गौरवर्णीय, ज्याने आम्हा कोणालाही जे जमलं नव्हतं ते करून दाखवलं होतं!

'काळ आला होता पण वेळ आली नव्हती' या म्हणीची आठवण करून देणारी अशी एक भयंकर घटना हैद्राबाद पोलीस कारवाईच्या चौथ्या दिवशी हैद्राबाद शहरात घडणार होती, पण ती टळली! अली यावर जंग यांच्या 'Hyderabad in retrospect' या पुस्तकात होऊ घातलेल्या त्या घटनेचा उल्लेख आला आहे. भारतीय सैन्य दुसऱ्या दिवशी हैद्राबाद शहरात शिरणार

होते व त्या क्षणी रझवीचे 'स्वतंत्र हैद्राबाद'चे स्वप्न धुळीस मिळणार होते. चिडलेल्या रझवीने ते घडण्यापूर्वी शहरातील हिंदूंची सर्रास कत्तल करण्याचा निर्णय घेतला! दुसरे दिवशी हैद्राबाद शहरात भारतीय सैन्य दाखल होण्यानंतर शहरातील मुसलमानांचे काय होईल याची जाणीव जेव्हा त्याला करून देण्यात आली, तेव्हा त्याने आपला निर्णय बदलला! रझाकारांचे प्रमुख केंद्र ज्याला 'दारूस सलाम' या नावाने ओळखले जाई, ते आमच्या तेव्हाच्या घरापासून अर्धा मैलाहूनही कमी अंतरावर होते. रझवीने शेवटच्या क्षणी आपला निर्णय बदलला नसता तर काय घडले असते या कल्पनेने आजही माझे मन शहारते.

स्वामीजींच्या आत्मचरित्राची पहिली आवृत्ती वाचल्यानंतर मला प्रामाणिकपणे असे वाटले की, एका वाचनीय अशा पुस्तकाचे शीर्षक मात्र पुस्तकाच्या एकूण स्वरूपाशी सुसंगत नाही. स्पष्टच लिहावयाचे झाल्यास असे म्हणावे लागेल की, ते वाचकांची दिशाभूल करणारे असे आहे. 'हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी' हे शीर्षक वाचल्यानंतर वाचकांचा असा ग्रह होतो की, या पुस्तकात स्वामीजींनी फक्त हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामाबाबत त्यांच्या आठवणी लिहिल्या आहेत व त्या मनोभूमिकेतून ते जेव्हा हे पुस्तक वाचतात, तेव्हा त्यांना या आठवणी त्रोटक अशा वाटतात. आणि स्वामीजींनी त्या काळात घडलेल्या घटनांना व बारकाव्यांना न्याय दिला नाही, असे त्यांना साहजिकच वाटते, त्यामुळे त्यांच्या पदरी काही अंशी निराशा पडते. स्वामीजींच्या जीवनातील ठळक आठवणींचा व घटनांचा हा संग्रह आहे हे जेव्हा आपल्या लक्षात येते, तेव्हा या आठवणींचे मोल आपल्या लक्षात येते.

स्वामीजींच्या आत्मचरित्रातून त्यांचे जीवन कसे घडत गेले याची आपल्याला कल्पना येते आणि म्हणूनच मला असे वाटते की, दुसऱ्या आवृत्तीत पुस्तकाचे शीर्षक त्या विषयाला अनुरूप असे असावे.

स्वामीजींनी 'दोन शब्द' या शीर्षकाखाली जे लिहिले आहे, त्यावरून ते हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामाबद्दल लिहिण्यास फारसे उत्सुक नव्हते हे आपल्या लक्षात येते. त्या प्रकारचे लिखाण त्यांच्या स्वभावाला मानवण्यासारखे नव्हते. अशा प्रकारच्या लिखाणात 'मी'चा वापर जास्त होतो व त्यांना ते नको होते. तरीही मित्रांच्या आग्रहावरून त्यांनी या विषयावर लिहिले. त्यांच्या वृत्तीला मानवेल तेवढेच. त्या वेळी त्यांची तब्येतही विशेष चांगली नव्हती. पुस्तक वाचताना या सर्व बाबी आपण लक्षात घ्याव्यात असे मला प्रामाणिकपणे वाटते.

स्वामीजींचे आत्मचरित्र हे एक आठवणींचे भांडार आहे. त्या सगळ्यांबद्दल लिहावयाचे झाल्यास एक छोटे पुस्तकच लिहावे लागेल. मी एवढेच म्हणेन की, त्या सर्वच अत्यंत वाचनीय अशा आहेत. त्यातल्या काही तर अत्यंत

हृदयस्पर्शी अशा आहेत. त्यांच्या आत्मचरित्रातील काही भाग वाचत असताना मला महात्मा गांधींच्या आत्मचरित्राची आठवण येत होती. गांधीजींप्रमाणे स्वामीजीसुद्धा आपले मनोविकार ताब्यात ठेवण्याबाबत व निर्मळ जीवन जगण्याबाबत किती प्रयत्नशील असत याची कल्पना त्यांच्या अंमळनेर व हिप्परगे या गावातील दिनचर्येवरून येते.

स्वामीजींचे आत्मचरित्र वाचत असताना दुसऱ्या एका कारणाकरता मला महात्मा गांधींची आठवण आली. दक्षिण आफ्रिकेतील आपल्या एका सहकाऱ्याशी बोलताना गांधी म्हणाले होते, 'I know many persons in the domain of religion, who are politicians at heart, whereas I am a man of religion and yet in politics because my religious duty demands my participation in politics.'

आध्यात्मिक वृत्तीच्या स्वामीजींनी राजकीय क्षेत्रात उडी घेतली होती ती केवळ आपल्या धार्मिक कर्तव्यांच्या जाणिवेतून! स्वामीजींना त्यांच्या विद्यार्थिदशेतही कोणावरही झालेला अन्याय सहन होत नसे. कित्येकदा त्यांना त्याबाबत शिक्षाही भोगावी लागली होती.

जेव्हा जेव्हा मी स्वामीजींच्या जीवनाबद्दल विचार करतो, तेव्हा तेव्हा मला एक अत्यंत अर्थपूर्ण इंग्रजी वाक्य आठवते. ते वाक्य असे आहे: 'The evils in the world are not due to bad people; they are due to the timidity of good people.' ज्यांना आपण चांगली माणसे म्हणतो ती वास्तवात भित्री माणसे असतात व त्यांच्या भित्रेपणामुळे वाईट माणसांचे फावते, असा या वाक्याचा अर्थ होतो. वाईट गोष्टींना तोंड देण्याकरता लागणारे असामान्य धैर्य स्वामीजींत होते आणि तेच एका अर्थाने त्यांचे वेगळेपण होते. हैद्राबाद स्वातंत्र्यसंग्रामात हजारो तरुणांनी स्वामीजींच्या हाकेला प्रतिसाद दिला, त्याचे एक महत्त्वाचे कारण हेही होते की, स्वामीजींच्या नि:स्वार्थीपणाची तीव्र जाणीव त्यांना होती! त्यांचा नैतिक अधिकार एवढा होता की त्यांच्याकरिता प्राण देण्याची त्यांची तयारी होती!

आज मी हे सगळं लिहीत असताना माझ्या डोळ्यासमोर जे चित्र उभे राहिले आहे ते हैद्राबाद शहरातील 17 सप्टेंबर 1948 च्या संध्याकाळचे आहे. त्या दिवशी हैद्राबाद संस्थानाविरुद्ध करण्यात आलेली पोलीस कारवाई यशस्वीरीत्या संपुष्टात आली होती. भारतीय लष्कराने हैद्राबादचा ताबा घेतला होता. रझाकारांचा जुलूम संपला होता. त्यांचा मागमूसही कुठे दिसत नव्हता. पाताळयंत्री निझामाचे सर्व डावपेच वाया गेले होते. त्यांच्या 'किंगकोठी' या राजवाड्यावर अवकळा पसरली होती. कित्येक दिवसांनी हिंदू स्त्रिया

देवदर्शनासाठी व भाजीपाला आणण्यासाठी आनंदाने बाहेर पडल्या होत्या. संध्याकाळी पाचच्या सुमारास एक प्रचंड मिरवणूक निघाली होती. त्यात हजारो लोक सामील झाले होते. कित्येकांच्या हातात तिरंगी ध्वज होते. 'शाहे उस्मान झिंदाबाद – हैद्राबाद पाईंदाबाद' ही घोषणा नेस्तनाबूत झाली होती. आनंदाने बेहोश झालेला तो प्रचंड जनसमुदाय तीन नावांचा जयघोष करत होता व ती तीन नावे होती – पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल व स्वामी रामानंद तीर्थ!

**डॉ. न. गो. राजूरकर, हैद्राबाद**
जुलै 2025

(डॉ.राजूरकर यांनी तीन दशकांपेक्षा अधिक काळ राज्यशास्त्र विषयाचे अध्यापक म्हणून काम केले आहे. हैद्राबाद येथील उस्मानिया विद्यापीठात राज्यशास्त्राचे विभाग प्रमुख आणि त्याच विद्यापीठात राज्यशास्त्र विषयाच्या अभ्यासमंडळाचे प्रमुख म्हणून काम केले आहे. 'लोकशाही, राष्ट्रवाद व समाजवाद यांच्या संदर्भातील नेहरूंच्या संकल्पना' या विषयांवर त्यांनी पीएच.डी. केली आहे.

'गांधी, नेहरू आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ' हा त्यांच्या विशेष अभ्यासाचा विषय राहिला आहे. भारतातील व अमेरिकेतील अनेक विचारपीठांवरून त्यांनी विविध विषयांवर व्याख्याने दिली आहेत. त्यांनी लिहिलेली दीड डझन (मराठी व इंग्रजी) पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.)